महाराष्ट्र पोलीस
नवी मुंबई

# पोलीस आयुक्त कार्यालय, नवी मुंबई

भारतीय रिझर्व्ह बँकेसमोर, से. १०, सीबीडी, बेलापूर, नवी मुंबई

**email-** establishmentbr-nm@mahapolice.gov.in


क्र.पोआ/नमुं/आस्था-६/पोलीस भरती -२०२४-२०२५/८४ /२०२६, नवी मुंबई, दिनांक :-२६/०३/२०२६.

## पोलीस शिपाई भरती सन २०२४-२५ च्या लेखी परिक्षेच्या अनुषंगाने उमेदवारांना सुचना

१. नवी मुंबई घटकाच्या पोलीस शिपाई भरती सन २०२४-२५ च्या लेखी परिक्षेचा दिनांक, वेळ, ठिकाण, परिक्षा केंद्राच्या ठिकाणी उमेदवारांनी रिपोर्ट करण्याची वेळ इत्यादीचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | दिनांक व वेळ |
|---|---|---|
| **१** | **लेखी परिक्षेचे केंद्राचे नांव व पत्ता** | **डी.वाय.पाटील स्टेडीयम, मुख्य प्रवेशव्दार, सेक्टर-७, नेरुळ, नवी मुंबई ४००० ७०६.** |
| **२** | **लेखी परिक्षेची दिनांक व वेळ** | **दि.२९.०३.२०२६ रोजी सकाळी ०७.०० ते ०८.३०** |
| **३** | **लेखी परिक्षा केंद्राच्या ठिकाणी उमेदवारांनी उपस्थित राहण्याची वेळ** | **दि.२९.०३.२०२६ रोजी सकाळी ०५.०० वाजता** |

१. Maha IT कडुन मैदानी चाचणी वेळी दिलेले प्रवेशपत्र व लेखी परिक्षेचे प्रवेशपत्र सोबत आणणे बंधनकारक आहे. त्याशिवाय उमेदवारांना लेखी परिक्षेस प्रवेश दिला जाणार नाही याची त्यांनी नोंद घ्यावी.

२. उमेदवारांनी आधारकार्ड व पासपोर्ट साईज २ फोटा सोबत आणावेत.

३. परीक्षा केंद्रात भ्रमणध्वनी/ डिजीटल डायरी/ मायक्रोफोन/मायक्रो कॅमेरा डिव्हाईस/ कॅल्क्युलेटर/ डिजीटल नोटपॅड/ नोट्स पुस्तके / ईअरफोन/हिअरिंग एड डिव्हाईस/ स्मार्ट वॉचेस /स्मार्ट आय ग्लासेस इत्यादी तसेच इतर कुठलेही असे साहित्य, ज्याचा कॉपी करण्यासाठी उपयोग होईल अथवा उपयोग होवू शकतो असे साहित्य आणण्यास सक्त मनाई आहे. असे करणारा उमेदवार आढळुन आल्यास त्यास त्याच क्षणी बाद ठरवून त्यांचे विरुध्द महाराष्ट्र स्पर्धा परीक्षा (अनुचित मागास प्रतिबंध) अधिनियम २०२४ अन्वये कायदेशिर कारवाई करण्यात येईल.

४. उमेदवारास बॅग्ज, मोबाईल फोन, डीजीटल/इलेक्ट्रॉनिक्स दुरसंचार साधने इत्यादी प्रतिबंधित साधने परिक्षा केंद्रात आणण्यास मनाई आहे.

५. उशीरा आलेल्या उमेदवारास परिक्षाकेंद्रात प्रवेश दिला जाणार नाही.

६. परिक्षाकेंद्रात उमेदवारांना Writing Pad तसेच उत्तरपत्रिका लिहिण्यासाठी काळा बॉलपेन पुरविण्यात येईल. सोबत पेन ,पेन्सिल, खोड रबर इत्यादी साहित्य परीक्षा केंद्रात नेण्यास प्रतिबंध आहे.

७. परिक्षाकेंद्रात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली असल्याने उमेदवारांना पाण्याची बाटली परिक्षा केंद्रात नेण्यास मनाई आहे.

८. परिक्षा संपल्यानंतर उमेदवार त्यांना दिलेली प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिकेची कार्बन प्रत घेवून जावू शकतात.

९. परीक्षा केंद्रात प्रवेश केलेल्या उमेदवारास परीक्षा संपेपर्यंत बाहेर जावू देण्यात येणार नाही.

१०. उत्तरपत्रिकेवर व लेखी परीक्षेच्या प्रवेशपत्रावर देण्यात आलेल्या सुचनांचे उमेदवारांनी तंतोतंत पालन करावे.

Sanjaykumar Surgounda Patil
Digitally signed by Sanjaykumar Surgounda Patil
Date: 2026.03.26 12:41:01 +05'30'

दिनांक :- २६.०३.२०२६

ठिकाण :- नवी मुंबई.

(संजयकुमार पाटील)
पोलीस उपआयुक्त, मुख्यालय
नवी मुंबई.